प्रेस नोट दिनांक २५/११/२०१९

| | |
|---|---|
| अेसीबी | रत्नागिरी युनिट |
| आरोपी लोकसेवक | श्रीमती अस्मिता वैभव चोरगे, अव्वल कारकुन, तहसिलदार कार्यालय राजापूर, ता. राजापूर, जि. रत्नागिरी. |
| घटनेचे ठिकाण | महसुल कक्ष, तहसिलदार कार्यालय राजापूर, ता. राजापूर, जि. रत्नागिरी. |
| मागितलेली लाचेची रक्कम | १०,०००/- रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | तडजोडअंती स्विकारलेली लाचेची रक्कम ८,०००/- रुपये. |
| थोडक्यात हकिगत | यातील तक्रारदार यांचे नावे मौजे. तरळवाडी कोदवली, ता. राजापूर जि. रत्नागिरी येथे स.न. ४ .अ, हि.न. ६-अ-१ एकुण क्षेत्र ०-२७-९५ वरकस व ०-२७-०५ पो.खराबा मधील ०३ गुंठे जमिन कुळ म्हणुन लागलेली आहे. या कुळ म्हणुन लागलेल्या ०३ गुंठे जमिनीचा वेगळा ७/१२ उतारा तयार होण्यासाठी त्यांनी तहसिलदार राजापूर यांचेकडे अर्ज केला होता. त्या अर्जाचे अनुषंगाने स्वतंत्र ७/१२ उतारा बनविण्याबाबतचे मा. तहसिलदार, राजापूर यांचे आदेश पारीत करण्याकरीता सदर कार्यालयात काम करणाऱ्या लोकसेविका श्रीमती चोरगे यांनी तक्रारदार यांचेकडे रू. १०,०००/- रक्कमेची लाचेची मागणी केली. म्हणुन तक्रारदार यांनी लोकसेविका श्रीमती चोरगे यांचेविरूध्द लाचेच्या मागणीची तक्रार दिनांक २५/११/२०१९ रोजी दिलेली आहे.<br>सदर तक्रारीचे अनुषंगाने दिनांक २५/११/२०१९ रोजी केलेल्या पडताळणी कारवाई मध्ये श्रीमती चोरगे, अव्वल कारकुन, तहसिलदार कार्यालय राजापूर, ता. राजापूर, जि. रत्नागिरी यांनी तक्रारदार यांचे नावे स्वतंत्र ७/१२ उतारा बनविण्याबाबतचे मा. तहसिलदार, राजापूर यांचे आदेश पारीत करण्याकरीता १०,०००/- रूपये लाचेची मागणी करून, तडजोडीअंती ८,०००/-रुपये लाचेची मागणी केल्याचे व ती स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.<br>पडताळणीमध्ये निष्पन्न झालेनुसार लागलीच सापळा आयोजित केला असता, लोकसेविका श्रीमती अस्मिता वैभव चोरगे, अव्वल कारकुन, तहसिलदार कार्यालय, राजापूर, ता. राजापूर, जि. रत्नागिरी यांनी तक्रारदार यांचेकडुन ८,०००/- रुपये लाचेची मागणी करून, मागणी केलेली लाच रक्कम तक्रारदार यांचेकडुन स्विकारल्यानंतर त्यांना दिनांक २५/११/२०१९ रोजी १७.४५ वा. महसुल कक्ष, तहसिलदार कार्यालय राजापूर, ता. राजापूर, जि. रत्नागिरी येथे पंचासमक्ष रंगेहात पकडण्यात आले आहे. |

ॲन्टी करप्शन ब्युरो, रत्नागिरी तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणताही शासकिय अधिकारी/कर्मचारी किंवा त्याचे वतीने खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील तर कृपया ॲन्टी करप्शन ब्युरो, रत्नागिरी कार्यालयाशी खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

**Toll Free No** :- 1064
**Telephone No** :- 02352/222893
**Office email** :- dyspacbratnagiri@mahapolice.gov.in
**Website** :- www.acbmaharastra.gov.in
**Mobile App** :- www.acbmaharastra.net
**Facebook Page** :- www.facebook.com/MaharastraACB

Dy. Supdt. of Anti Corruption Bureau * RATNAGIRI * सत्यमेव जयते

N.D.
(निरंजन [illegible])
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी